JULY 2024-25

# आदर्शमय जीवन जगत योग साधना करावी

## संजीव कुलकर्णी

इचलकरंजी, ता.४-

"मी कोण आहे हे जाणून घेतले पाहिजे, मी चैतन्य स्वरूप आत्मा, सत्चित आनंद स्वरूप आहे. नियमित व्यायाम, सात्वीक आहार पाहिजे, त्यासाठी सात तास झोप पाहिजे, एकाग्रचित्त मन पाहिजे, अनंत विश्व हे भगवंताचे रूप आहे म्हणून शरीर, मन बुध्दीची शुध्दता ठेऊन सर्वश्रेष्ठ समर्पित सुंदर व आदर्शमय जीवन जगून अष्टांग योगाची साधना केली पाहिजे असे विचार आत्मदर्शनचे प्रणेते योगगुरू संजीव कुलकर्णी यांनी व्यक्त केले.



आत्मदर्शन शिबीराचे दीपप्रज्वलनाने उदघाटन करताना परमपूज्य संजीव कुलकर्णी, रोटरीचे अध्यक्ष संतोष पाटील, प्रकाश रावळ, आण्णासाहेब शहापुरे व इतर मान्यवर.

रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी व आत्मदर्शन परिवार इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने रोटरी क्लब हॉल येथे घेण्यात आलेल्या २७१ व्या आत्मदर्शन शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी गणेश पूजन, दीपप्रज्वलन करताना ते बोलत होते. स्वागत व प्रास्ताविक रोटरी क्लबचे अध्यक्ष संतोष पाटील यांनी केले. योगगुरू संजीव कुलकर्णी यांचे स्वागत रोटरीचे सेक्रेटरी चंद्रकांत मगदूम यांनी केले. गुरूजींची ओळख सविता मकोटे यांनी करून दिली.

यावेळी जे. आर. काबरा, आण्णासाहेब शहापुरे, डॉ. लक्ष्मीकांत तोष्णीवाल, संजय सातपुते, चंद्रकांत चौगुले, पुजा कोरे, सुनिल सातपुते, पुनीत जैन, प्रमोद पाटील यांनी आत्मदर्शन शिबीराचे अनुभव सांगितले. सूत्रसंचालन प्रकाश रावळ यांनी केले. शिबीरास इचलकरंजी आणि परिसरातील शिबीरार्थी व मान्यवर उपस्थित होते.



इचलकरंजी : आत्मदर्शन शिबिराचे दीप प्रज्वलनाने उद्घाटन करताना परमपूज्य संजीव कुलकर्णी गुरूजी, रोटरीचे अध्यक्ष संतोष पाटील, प्रकाश रावळ, आण्णासाहेब शहापुरे, मान्यवर.

# शरीर, मन, बुद्धीची शुद्धता ठेवून आदर्शमय जीवन जगावे

- संजीव कुलकर्णी गुरूजी
- आत्मदर्शन शिबिरास प्रारंभ

**प्रतिनिधी**

इचलकरंजी

मी कोण आहे ? जाणून घेतले पाहिजे, मी चैतन्य स्वरूप आत्मा आहे, मी सत्चित आनंद स्वरूप आहे, शरीर माध्यम खलु धर्म साधनम्, नियमित व्यायाम, सात्वीक आहार पाहिजे, त्यासाठी सात तास झोप पाहिजे, एकाग्रचित मन पाहिजे, अनंत विश्व हे भगवंताचे रूप आहे म्हून शरीर, मन बुध्दीची शुध्दता ठेऊन सर्वश्रेष्ठ समर्पित सुंदर व आदर्शमय जिवन जगून अष्टांग योगाची साधना केली पाहिजे, असे विचार आत्मदर्शनचे प्रणेते योगगुरू परमपूज्य संजीव कुलकर्णी गुरूजी यांनी व्यक्त केले.

येथील रोटरी क्लब व आत्मदर्शन परिवाराच्यावतीने रोटरी क्लब हॉल येथे आत्मदर्शन शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी गणेश पूजन, दीपप्रज्वलन करताना ते बोलत होते.

प्रास्ताविक रोटरी क्लबचे अध्यक्ष संतोष पाटील यांनी केले. संजीव कुलकर्णी यांचे स्वागत रोटरीचे सेक्रेटरी चंद्रकांत मगदूम यांनी केले. गुरूजींची ओळख सविता मकोटे यांनी करून दिली.

यावेळी जे. आर. काबरा, आण्णासाहेब शहापुरे, डॉ. लक्ष्मीकांत तोष्णीवाल, संजय सातपुते, चंद्रकांत चौगुले, पुजा कोरे, सुनिल सातपुते, पुनीत जैन, प्रमोद पाटील यांनी आतमदर्शन शिबीराचे अनुभव सांगितले, सूत्रसंचालन प्रकाश रावळ यांनी केले. शिबीरास इचलकरंजी आणि परिसरातील शिबीरार्थी व मान्यवर उपस्थित होते.

JULY - 2024-25




# मानवाच्या उत्कर्षासाठी गुरु, अध्यात्मिक ग्रंथ आवश्यक : फडणीस

**इचलकरंजी : प्रतिनिधी–**

मानवाच्या उत्कर्षासाठी गुरु, अध्यात्मिक ग्रंथ आवश्यक आहेत. ते भारतीय संस्कृतीत प्रभावीपणे रुजलेले आहेत असे विचार वस्त्रोद्योगातील तज्ञ चंद्रशेखर फडणीस यांनी व्यक्त केले. रोटरी क्लब आणि प्रोबस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गुरुपौर्णिमा महोत्सवात शोध गुरुतत्त्वाचा विषयावर ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी फडणीस यांनी आपले आई-वडील, शिक्षक, आचार्य तसेच व्यासांचे महत्त्व अत्यंत प्रभावीपणे मांडले. गुरूंचे महत्त्व सांगताना गुरूंचे प्रकार, गुरुतत्त्व, त्याचप्रमाणे पापांचे प्रकार, अज्ञान, प्रारब्ध, गुरुतत्त्व जागे करण्यासाठी सद्गुरूंची आवश्यकता याविषयी समग्रपणे विचार मांडले. इचलकरंजीविषयी आठवणी सांगत असताना कल्लाप्पाण्णा आवाडे दादा, चंद्रकांत काणे सर यांनी आपणाला कसे घडवले हे सांगत त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ पूजन, दीप प्रज्वलन करण्यात आले. रोटरीचे अध्यक्ष संतोष पाटील यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास महापालिकेचे आयुक्त ओमप्रकाश दिवटे, धोंडीराम कस्तुरे, विठ्ठलराव डाके, रवींद्र सौंदत्तीकर, चंद्रकांत मगदूम, प्रोबसचे अध्यक्ष सदाशिव कदम, अभिजीत होगाडे, महिला अध्यक्षा हमीदा गोरवाड, रामभाऊ कुडचे, पुष्पा मोरे, वैशाली नायकवडे उपस्थित होते.

# आत्मस्वरूपात भगवान पाहणे म्हणजे आत्मदर्शन : संजीव कुलकर्णी



**इचलकरंजी : प्रतिनिधी–**

विश्व म्हणजे मंदीर आहे. संपूर्ण जीवन म्हणजे सत्संग आहे. शरीर, मन आणि बुध्दी शुध्द ठेऊन आत्मस्वरूपात भगवान पहाणे म्हणजे आत्मदर्शन होय, असे विचार आत्मदर्शनचे प्रणेते, योगगुरु पूज्य संजीव कुलकर्णी (गुरुजी) यांनी व्यक्त केले. येथील रोटरी क्लब आणि आत्मदर्शन परिवाराच्या संयुक्त विद्यमाने १४ दिवस चाललेल्या १७१ व्या शिबीर समारोपात ते बोलत होते.

पूज्य कुलकर्णी यांनी संतांचे सानिध्य म्हणजे भगवंताचे अनुसंधान आहे. गुरु, निसर्गासोबत राहिल्याने आध्यात्मिक उन्नती होते. सद्गुरू हे विश्वशांतीचे स्थान आहे. त्यासाठी पुन्हःपुन्हा गुरुंच्या सानिध्यात राहिले पाहिजे, असे सांगितले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते गणेश पूजन, दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी आत्मदर्शन शिबीरात भाग घेतलेल्या साधकांनी आपले अनुभव कथन केले. यावेळी साधकांनी मनोरंजनात्मक कार्यक्रमही सादर केले. शिबीरासाठी अमोल मेटे, सुजित मगदूम, विनायक बडवे, प्रशांत शिराळकर, आण्णासाहेब शहापुरे, शिवनारायण उंटवाल, प्रकाश मेटे, प्रकाश रावळ, श्रीपती कोरे माया पसारे, ज्योती बावणे, पुजा कोरे, सविता मकोटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

2024-25 SEPTEMBER

दैनिक महासत्ता इचलकरंजी



बॅडमिंटन स्पर्धेचे बक्षीस वितरण करताना संतोष पाटील, चंद्रकांत मगदूम, संजय खोत, डॉ.लक्ष्मीकांत तोष्णीवाल आदी.

# रोटरी क्लबतर्फे बॅडमिंटन स्पर्धा उत्साहात संपन्न

इचलकरंजी,ता.२९-

रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी प्रायोजित इचलकरंजीतील खेळाडूंसाठी बॅडमिंटन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धेला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. ७० खेळाडू यात सहभागी झाले होते.

स्पर्धेचे उद्घाटन इचलकरंजी महानगरपालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१७० चे असिस्टंट गव्हर्नर यतिराज भंडारी, रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीचे अध्यक्ष संतोष पाटील, सेक्रेटरी चंद्रकांत मगदूम, डॉ.लक्ष्मीकांत तोष्णीवाल, महादेव खारगे, संजय खोत व रोटरीचे सदस्य उपस्थित होते. तेजस तोष्णीवाल यांच्या नियोजनाने स्पर्धा उत्साहात पार पडल्या. पारितोषिक वितरण समारंभासाठी रोटरीचे अध्यक्ष संतोष पाटील, सेक्रेटरी चंद्रकांत मगदूम, संजय खोत, डॉ.लक्ष्मीकांत तोष्णीवाल, राजेंद्र डाळ्या उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेसाठी महेश बाहेती, राजेंद्र डाळ्या, राजू केंगार, अविनाश रानडे यांचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेत अरिहंत बंब, देवांश जैन, कुंज्ञ सोनी, राजवीर वडिंगे, माधव व्यास, उज्वल हेडा, रिया नायकुडे, अनुष्का कबाडे, अभिनव सावंत व केशव हेडा, देवेश राठी, आदित्य लखोटिया, रुद्र उमरानिया, तन्वी कबाडे, केशव जोशी व सायली अळद यांनी यश संपादन केले आहे.

JULY-2024-25



गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना चंद्रशेखर फडणीस, शेजारी व्यासपिठावर उपस्थित प्रमुख मान्यवर.

# रोटरी, प्रोबस क्लबतर्फे गुरुपौर्णिमेचा सोहळा संपन्न

इचलकरंजी, ता. २६-

रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी व प्रोबस क्लब ऑफ इचलकरंजी यांचे संयुक्त विद्यमाने गुरु पौर्णिमेचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

प्रमुख पाहुणे म्हणून वस्त्रोद्योगातील तज्ञ चंद्रशेखर फडणीस यांनी शोध गुरुतत्त्वाचा या विषयावर आपले विचार मांडले. हे सांगत असताना त्यांनी आपले आई-वडील, शिक्षक, आचार्य तसेच व्यासांचे महत्त्व सांगितले. व्यासांची महती व गुरुग्रंथ मानवाचा उत्कर्ष करण्यासाठी आवश्यक आहेत व ते भारतीय संस्कृतीत प्रभावीपणे रुजलेले आहेत, असे नमूद केले. प्रारंभी ग्रंथ पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते झाले. रोटरीचे अध्यक्ष संतोष पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. पाहुण्यांची ओळख रवींद्र सौंदत्तीकर यांनी करून दिली. या कार्यक्रमास इचलकरंजी महानगरपालिकेचे आयुक्त ओमप्रकाश दिवटे, धोंडीराम कस्तुरे, विठ्ठलराव डाके, रोटरी सेक्रेटरी चंद्रकांत मगदूम, प्रोबस अध्यक्ष सदाशिव कदम, प्रोबस महिला अध्यक्षा हमीदा गोरवाडे, रामभाऊ कुडचे, पुष्पा मोरे व इतर मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन वैशाली नायकवडे यांनी केले. आभार अभिजीत होगाडे यांनी मानले.

## अवतीभवती

# 'शोध गुरूतत्त्वाचा'वर फडणीसांचे व्याख्यान

इचलकरंजी : रोटरी क्लब व प्रोबस क्लब ऑफ इचलकरंजीतर्फे वस्त्रोद्योगतज्ज्ञ चंद्रशेखर फडणीस यांचे 'शोध गुरुतत्त्वाचा' या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी गुरूंचे महत्त्व सांगताना गुरूंचे प्रकार, गुरुतत्त्व, त्याचप्रमाणे पापांचे प्रकार, अज्ञान, प्रारब्ध गुरुतत्त्व जागे करण्यासाठी सद्‌गुरूंची आवश्यकता याविषयी विचार मांडले. आयुक्त ओमप्रकाश दिवटे, धोंडीराम कस्तुरे, विठ्ठलराव डाके, चंद्रकांत मगदूम, प्रोबसचे अध्यक्ष सदाशिव कदम, महिला अध्यक्ष हमिदा गोरवाडे, रामभाऊ कुडचे, पुष्पा मोरे उपस्थित होते. रोटरीचे अध्यक्ष संतोष पाटील यांनी स्वागत केले. पाहुण्यांची ओळख रवींद्र सौंदत्तीकर यांनी करून दिली. सूत्रसंचालन वैशाली नायकवडे यांनी केले. आभार अभिजित होगाडे यांनी मानले.

OCTOBER - 2024-25




इचलकरंजी : रोटरी क्लबतर्फे 'तारुण्याच्या उंबरठ्यावर' प्रबोधनपर व्याख्यानात बोलताना डॉ. अनिल मडके, व्यासपीठावर डॉ. पल्लवी अनुजे, मान्यवर.

# नेहमी आनंदी राहण्याचा प्रयत्न करा

## डॉ. अनिल मडके : रोटरी क्लबतर्फे 'तारुण्याच्या उंबरठ्यावर' प्रबोधनपर व्याख्यान

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

वयात येताना होणारे शारीरिक बदल यांच्याकडे शास्त्रशुद्ध दृष्टीने कसे पहावे आणि त्याचा अभ्यासात व्यत्यय आणू न देता सकारात्मक दिशेने वाटचाल कशी करावी याची विवेचन स्लाइड्स, व्हिडिओ आणि व्याख्यानाच्या माध्यमातून सांगलीचे हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अनिल मडके व डॉ. पल्लवी अनुजे यांनी श्रीमंत ना. बा. घोरपडे नाट्यगृह येथे आठवी व नववीच्या विद्यार्थी विद्यार्थिनी करता आयोजित केलेल्या तारुण्याच्या उंबरठ्यावर या प्रबोधनपर व्याख्यानात ते बोलत होते.

रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी, रोटरी क्लब इचलकरंजी ॲन्सच्यावतीने हा लैंगिक शिक्षणावर आधारित प्रबोधनपर कार्यक्रम पार पडला. दोन सत्रात झालेल्या कार्यक्रमात १८०० विद्यार्थी – विद्यार्थिनींनी व शिक्षक यांनी सहभाग घेतला होता.. आरोग्य विषयी डॉ. अनिल मडके व डॉ. पल्लवी अनुजे यांनी विद्यार्थ्यांना आहारात पालेभाज्या, प्रथिने, फळभाजी यांचा समावेश करावा. नियमित व्यायाम करावा, व्यसनाधीनता, पुरेशी झोप याचबरोबर स्वच्छतेची काळजी याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी आज प्रत्येकाने धडपड करण्याची गरज आहे यासाठी वेळेला महत्त्व द्या, मोबाईलच्या जाळ्यात विद्यार्थी व तरुण पिढी मोठ्या प्रमाणात अडकत आहे त्यातून बाहेर पडण्याची गरज आहे थोर व्यक्तींचा जीवन परिचय वाचा त्यातून तुम्हाला एक मोठी प्रेरणा मिळेल पॉझिटिव्ह राहा, नेहमी आनंदी राहण्याचा प्रयत्न करा, असे त्यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ. मडके यांनी समर्पक उत्तरे दिली. रोटरीचे अध्यक्ष संतोष पाटील यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रोजेक्ट चेअरमन पिरगोंडा पाटील, रोटरी ॲन्सच्या अध्यक्षा स्वाती सातपुते यांनी करून दिली. आभार सेक्रेटरी चंद्रकांत मगदूम यांनी मानले. सूत्रसंचालन कौन्सिलर अभय यळरुटे यांनी केले. यावेळी रोटरीचे डी. एम. कस्तुरे, वसंत पाटील, पंकज कोठारी, श्रीनिवास दबडे, सत्यनारायण धूत, महेश दाते, शरद देसाई, शर्मिला पाटील, सुरेखा कोथळे उपस्थित होते.

SEPTEMBER - 2024-25

# 'गणेश सजावट'चे पारितोषिक वितरण

## इचलकरंजीत रोटरीतर्फे आयोजन : डॉ. तोष्णीवाल यांचा सत्कार

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. २७ : रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीतर्फे आयोजित गणेशोत्सवातील सार्वजनिक गणेश मंडळ व घरगुती गणेश सजावट स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ झाला. उत्कृष्ट मूर्ती, सामाजिक, समाज प्रबोधन, उत्कृष्ट देखावा, सजीव देखावा, कलात्मक देखावा, पौराणिक देखावा, ऐतिहासिक देखावा, असे देखावे सादर करणाऱ्या मंडळांना व घरगुती गणेशभक्तांना पारितोषिके वितरित केली.

पारितोषिक वितरण रोटरी क्लब, दाते मळा येथे झाले. प्रमुख पाहुणे म्हणून रोटरीचे उपप्रांतपाल यतीराज भंडारी उपस्थित होते. रोटरी क्लबचे अध्यक्ष संतोष पाटील, सचिव चंद्रकांत मगदूम, सागर पाटील, प्रकाश रावळ यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. लक्ष्मीकांत तोष्णीवाल यांनी मिरवणुकीवेळी साऊंड सिस्टीम आवाजाचा नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी कापसाचे बोळे वाटप केल्याबद्दल त्यांचा सत्कार केला.




इचलकरंजी : रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीतर्फे घरगुती व गणेशोत्सव मंडळांना पारितोषिक वितरण यतीराज भंडारी, संतोष पाटील आदींच्या उपस्थितीत केले.

**स्पर्धेचा अनुक्रमे निकाल :** सार्वजनिक गणेशोत्सव ॲवॉर्ड : अण्णाकावतील ग्रुप, साई गणेशोत्सव मंडळ, सावकार राजा गणेशोत्सव मंडळ, नारायण नगर गोंधळी समाज, नदीवेस परिसर बागडी समाज गणेशोत्सव मंडळ. समाज प्रबोधन देखावा : न्यू गणेश तरुण मंडळ, महालक्ष्मी सेवाभावी संस्था, व्यंकटेश्वरा गणेशोत्सव मंडळ. कलात्मक देखावा : कलानगर गणेशोत्सव मंडळ, शिवशक्ती गल्ली गणेशोत्सव मंडळ, मोरया ग्रुप, छत्रपती गणेशोत्सव मंडळ. समाज प्रबोधनपर हालता देखावा : वखार भाग गणेशोत्सव मंडळ, राजे युवक मंडळ. पौराणिक देखावा : रिंग रोडचा गजवक्र गणेश मंडळ, मोरया सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, राष्ट्रज्योत युवक मंडळ. उत्कृष्ट हलता देखावा : श्री लक्ष्मी को-ऑप प्रोसेसर्स, विश्वशांती मित्र मंडळ, बिरदेव वाचनालय गणेशोत्सव मंडळ. समाज प्रबोधनपर सजीव देखावा : हत्ती चौक गणेशोत्सव मंडळ. विशेष पुरस्कार : प्रेरणा चौक गणेशोत्सव मंडळ.

घरगुती गणेशोत्सव - उत्कृष्ट हलता देखावा : सुभाष परीट, दत्तराज इंदुलकर, अनिकेत मोरे, भालचंद्र टाकवडे. उत्कृष्ट समाज प्रबोधन देखावा : किरण काकडे, अर्चित जोशी, शीतल मोरे, शशिकांत भोसले, योगेंद्र व्हनुगरे. उत्कृष्ट सजावट : अमित जसवानी, अनिल हरणे, रणवीर कवटगे. ऐतिहासिक देखावा : नीलेश सातपुते, योगेश नाईक, सचिन कांबळे. पौराणिक देखावा : शिवाजी कुराडे, प्रियंका रोकडे, अरविंद चौगुले, योगेश मुदगल. विशेष पुरस्कार दिव्यांग गणेश भक्त : संदीप जाधव. रोटरी परिवार : सौरभ खारगे, मेघा घायतिडक, शिवदास कित्तुरे, राजारामशास्त्री जाधव, सुजित मगदूम, नेमिनाथ कोथळे, वसंत पाटील, आदी उपस्थित होते.

OCTOBER - 2024-25



इचलकरंजी : शहरात विविध ठिकाणी सोमवारी सामूहिक श्रमदानातून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

# इचलकरंजीत श्रमदानातून ४८ ठिकाणी स्वच्छता

## मोहिमेतून पाच टन कचरा संकलित

इचलकरंजी, ता. १ : शासनाच्या 'स्वच्छता ही सेवा' या संकल्पनेनुसार शहरात आज स्वच्छता अभियान राबवले. यामध्ये एकाच वेळी सामूहिक श्रमदानातून ४८ ठिकाणी स्वचछता मोहीम राबवली. त्यातून पाच टन कचरा संकलित केला. चार हजार नागरिक व एक हजार महापालिका कर्मचारी यामध्ये सहभागी झाले होते. त्यामुळे शहरातील बहुतांश महत्त्वाचा परिसर आज कचरामुक्त झाला.

मोहिमेचा प्रारंभ श्री शिवतीर्थ येथे आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उपायुक्त स्मृती पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. सहायक आयुक्त विजय कावळे, विजय राजापुरे, वित्त व लेखा अधिकारी विकास खोळपे, कार्यकारी अभियंता सुभाष देशपांडे, सहायक संचालक नगररचना प्रशांत भोसले, प्रशासन अधिकारी इरफान पटेल, आदी उपस्थित होते.

मोहिमेत रोटरी परिवार, कोल्हापूर जिल्हा गुरुप्रसाद योग समिती, संत गाडगे महाराज चॅरिटेबल ट्रस्ट, मनोरंजन मंडळ, तेज ज्ञान फाउंडेशन, असोसिएशन ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड आर्किटेक्ट, जयहिंद मंडळ, जितो परिवार, एएससी महाविद्यालय, बचत गटाच्या महिला, ज्येष्ठ नागरिक संघटना, आदी संस्थांचे सदस्य सहभागी झाले होते.

OCTOBER - 2024-25



# रोटरीचे विद्यार्थ्यांसाठी तारुण्याच्या उंबरठ्यावर प्रबोधनपर व्याख्यान संपन्न

**इचलकरंजी : प्रतिनिधी–**

वयात येताना होणाऱ्या शारीरिक बदलांकडे शास्त्रशुद्ध दृष्टीने कसे पहावे आणि त्याचा अभ्यासात व्यत्यय आणू न देता सकारात्मक दिशेने कशी वाटचाल करावी याचे विवेचन सांगलीचे हृदयरोग तज्ञ डॉ. अनिल मडके, डॉक्टर्स पल्लवी अनुजे यांनी स्लाइड्स, व्हिडिओ आणि व्याख्यानाच्या माध्यमातून केले. येथील रोटरी क्लबच्यावतीने इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांसाठी तारुण्याच्या उंबरठ्यावर या प्रबोधनपर व्याख्यानात ते बोलत होते. २ सत्रात झालेल्या या कार्यक्रमास १८०० विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

यावेळी डॉ. मडके, डॉ. अनुजे यांनी विद्यार्थ्यांना आहारात पालेभाज्या, प्रथिने, फळभाज्यांचा समावेश करावा. नियमित व्यायाम करावा, व्यसनाधिनता, पुरेशी झोप याचबरोबर स्वच्छतेची काळजी याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी प्रत्येकाने प्रयत्न करण्याची गरज आहे असून त्यासाठी वेळेला महत्व द्या, मोबाईलच्या जाळ्यातून बाहेर पडण्याची गरज आहे. थोर व्यक्तींचा जीवन परिचय वाचनातून एक मोठी प्रेरणा मिळेल, सकारात्मक रहा, नेहमी आनंदी राहण्याचा प्रयत्न करा असे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ. मडके यांनी समर्पक उत्तरे दिली. प्रारंभी रोटरीचे अध्यक्ष संतोष पाटील यांनी व्याख्यानाचा उद्देश विषद केला. २ सत्रात झालेल्या या कार्यक्रमास पिरगोंडा पाटील, स्वाती सातपुते, चंद्रकांत मगदूम, अभय येळरुटे, डी.एम. कस्तुरे, वसंत पाटील, पंकज कोठारी, श्रीनिवास दबडे, सत्यनारायण धूत, महेश दाते, शरद देसाई, शर्मिला पाटील, सुरेखा कोथळे उपस्थित होते.

OCTOBER · 2024-25

# नवदुर्गा रनचा इचलकरंजीत प्रारंभ

इचलकरंजी, ता. ३ : उपासना स्त्री शक्तीची... जोपासना आरोग्य, संस्कृतीची... हा मंत्र घेऊन येथील रिंगण फिटनेस फौंडेशनतर्फे नवदुर्गा रनच्या चौथ्या पर्वाला गुरुवारी प्रारंभ झाला. शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या उपनिरीक्षक उर्मिला खोत यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलीत करून नवदुर्गा रनची सुरुवात राणी बागेपासून झाली.

आई, पत्नी, बहीण, मुलगी ही नाती अत्यंत लिलया पार पाडणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा आदर, सन्मान करण्याबरोबरच त्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी या रनची सुरुवात केली. गुरुवारी सकाळी साडेसहा वाजता राणी बागेतून रनची सुरुवात केली. रोटरी क्लबचे अध्यक्ष संतोष पाटील, रोटरी एक्झिक्युटिव्हचे अध्यक्ष गणेश निकम, रोटरी इनरव्हिलच्या अध्यक्षा चंदा कोठारी, प्रकाश रोकडे, डॉ. राहुल पाटील, डॉ. उत्तम माळी, रॉयल बुलेट क्लबचे अध्यक्ष अरविंद माने, रिंगण फिटनेस फौंडेशनचे अध्यक्ष सचिन खोंद्रे, अध्यक्षा सुवर्णा तिवारे, प्रकाश मोरबाळे, सतीश मेटे, योग प्रशिक्षक सुहास पवळे, नीलेश कागिनकर यांच्या प्रमुख उपस्थितीत रनला प्रारंभ झाला.

अंबे माता की जय.. भारत माता की जय.. छत्रपती शिवाजी महाराज की जय.. या जयघोषात शिवतीर्थ मार्गे महात्मा गांधी पुतळा आणि पुन्हा राणी बाग अशी ही रन केली. नवदुर्गा रनच्या चौथ्या पर्वात इचलकरंजीसह विविध शहरातून सुमारे १२०० हून अधिक जणांनी व्हर्च्युअल पद्धतीने या रनमध्ये सहभाग घेतला आहे. नऊ दिवस चालणे, सायकलिंग आणि सूर्यनमस्कार आदी उपक्रमही घेण्यात येणार आहेत. गुरुवारची रन ही आईसाठी समर्पित होती.

यावेळी हाफ आयर्नमॅन स्पर्धा यशस्वी पार केलेल्या ॲड. जिया शेख, राजश्री शिंदे, वैशाली माळी, कविता पोवार आणि किरण शेट्टी या महिलांचा सत्कार केला. रनमध्ये डॉक्टर असोसिएशन, मेडिकल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसह ३०० हून अधिक जणांनी सहभाग घेतला.




इचलकरंजी : रिंगण फिटनेस फौंडेशनच्या वतीने नवदुर्गा रनच्या चौथ्या पर्वाला प्रारंभ झाला.

OCTOBER-2024-25

# रिंगण फिटनेसच्या 'नवदुर्गा रन'ला प्रारंभ

## सुमारे ३०० जणांचा सहभाग : 'आयर्नमॅन' झालेल्या महिलांचा सत्कार

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

उपासना स्त्री शक्तीची.. जोपासना आरोग्य, संस्कृतीची.. हा मंत्र घेवून येथील रिंगण फिटनेस फौंडेशनच्यावतीने नवदुर्गा रनच्या चौथ्या पर्वाला आज प्रारंभ झाला. शिवाजीनगर पोलिस -ठाण्याच्या उपनिरीक्षक उर्मिला खोत यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलीत करुन नवदुर्गा रनची सुरूवात झाली.

आई, पत्नी, बहिण, मुलगी ही नाती लिलया पार पाडणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा आदर, सन्मान करण्याबरोबरच त्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी या रनची सुरूवात करण्यात आली. गुरूवारी राणी बागेतून या रनची सुरूवात करण्यात आली. रोटरी क्लबचे अध्यक्ष संतोष पाटील, रोटरी एक्झिक्युटीव्हचे अध्यक्ष गणेश निकम, रोटरी इनरव्हिलच्या अध्यक्षा चंदा कोठारी, प्रकाश रोकडे, डॉ. राहुल पाटील, डॉ. उत्तम माळी, रॉयल बुलेट क्लबचे अध्यक्ष अरविंद माने, रिंगण फिटनेस फौंडेशनचे अध्यक्ष सचिन खोंद्रे, अध्यक्षा सुवर्णा तिवारे, प्रकाश मोरबाळे, सतीश मेटे, योग प्रशिक्षक सुहास पवळे, निलेश कागिनकर यांच्या प्रमुख उपस्थितीत रनला प्रारंभ झाला.




इचलकरंजी : रिंगण फिटनेसच्या 'नवदुर्गा रन'च्या प्रारंभावेळी संतोष पाटील, गणेश निकम, चंदा कोठारी, प्रकाश रोकडे, डॉ. राहुल पाटील, डॉ. उत्तम माळी, अरविंद माने, सचिन खोंद्रे, सुवर्णा तिवारे, प्रकाश मोरबाळे, सतीश मेटे.

अंबे माता की जय.. भारत माता की जय.. छत्रपती शिवाजी महाराज की जय.. या जयघोषात शिवतीर्थ मार्गे महात्मा गांधी पुतळा आणि पुन्हा राणी बाग अशी ही रन करण्यात आली. नवदुर्गा रनच्या चौथ्या पर्वात इचलकरंजीसह विविध शहरातून सुमारे १२०० हून अधिक जणांनी व्हर्च्युअल पध्दतीने या रनमध्ये सहभाग घेतला आहे. नऊ दिवस चालणे, सायकलींग आणि सूर्यनमस्कार आदी उपक्रमही घेण्यात येणार आहेत. आजची रन ही आईसाठी समर्पित होती.

यावेळी हाफ आयर्नमॅन स्पर्धा यशस्वी पार केलेल्या ॲड. जिया शेख, राजश्री शिंदे, वैशाली माळी, कविता पोवार आणि किरण शेट्टी या महिलांचा सत्कार करण्यात आला. या रनमध्ये डॉक्टर असोसिएशन, मेडीकल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसह सुमारे ३०० जणांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन दिनेश छाजेड यांनी केले. आभार शिवाजी शिंदे यांनी मानले. यावेळी कृष्णा गोदुकुप्पे, दीपक सुतार, किसन अक्केतंगेरहाळ, नारायण जाधव यांच्यासह रिंगण फिटनेस फौंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

OCTOBER . 2024 . 25



सौ.निशा दंडगे सौ.आरती पाटील संजय माळी सुभाष मगदूम सौ.अर्चना दाभोळे दिपक अथणे पार्श्वनाथ पाटील प्रा.शहाजहान मणेर

# रोटरी क्लबतर्फे नेशन बिल्डर अवॉर्ड जाहीर

इचलकरंजी,ता.२०-

**येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीच्या वतीने शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यात येतो. यावर्षीही क्लबने आदर्श शिक्षकांची निवड करून रोटरी इंटरनॅशनलचा मानाचा नेशन बिल्डर अवॉर्ड जाहीर करण्यात आले आहेत.**

यामध्ये बालवाडी विभागात सौ.निशा दंडगे (ना. बा. बालमंदिर), प्राथमिक विभागात सौ.आरती पाटील (माई बाल विद्यामंदिर), संजय माळी (कै.बाबुराव आवाडे, विद्यामंदिर क्रमांक ५१), माध्यमिक विभागामध्ये सुभाष मगदूम (व्यंकटेश्वरा इंग्लिश स्कूल), सौ.अर्चना दाभोळे (व्यंकटराव हायस्कूल), दीपक अथणे (आंतरभारती विद्यालय), पार्श्वनाथ पाटील (राजर्षी छ. शाहू हायस्कूल), महाविद्यालय विभागात प्रा. डॉ. शहाजहान मणेर (प्राचार्य, दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स व कॉमर्स कॉलेज) यांची निवड केली आहे.

सदरच्या आदर्श शिक्षक निवड समितीमध्ये रोटरी क्लबचे अध्यक्ष संतोष पाटील, सेक्रेटरी चंद्रकांत मगदूम, प्रोजेक्ट चेअरमन अजित कुरडे, शिवदास कित्तुरे, सुजित मगदूम यांनी सहभाग घेतला.

सदरचा अवॉर्ड वितरण समारंभ बुधवार ता.२३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता रोटरी श्रीमती सोनीदेवी रामबिलास बाहेती सेवा केंद्र दाते मळा,इचलकरंजी या ठिकाणी शिवाजी विद्यापीठाचे प्र.कुलगुरू प्रा.डॉ.पी.एस.पाटील यांच्याहस्ते व डॉ.प्रशांत कांबळे, यतीराज भंडारी यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे, असे रोटरी क्लबने प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले आहे.

# रोटरी क्लब इचलकरंजीतर्फे आदर्श शिक्षक नेशन बिल्डर ॲवॉर्ड जाहीर

**प्रतिनिधी**

इचलकरंजी

येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीच्या वतीने प्रत्येक वर्षी शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यात येतो. यावर्षीही पुरस्काराची परंपरा जोपासत क्लबने बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन क्षेत्रात आदर्श शिक्षकांची निवड करून रोटरी इंटरनॅशनलचा मानाचा नेशन बिल्डर ॲवॉर्ड देण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण बुधवार २३ रोजी सायंकाळी ६ वाजता सोनीदेवी बाहेती सेवा केंद्र, दाते मळा येथे शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, यांच्या हस्ते व डिस्ट्रिक्ट लिटरसी प्रमोशन सेक्रेटरी डॉ. प्रशांत कांबळे, उपप्रांतपाल यतीराज भंडारा यांच्या उपस्थितीत होणार आहे.

यामध्ये बालवाडी विभागात निशा भारत दंडगे (श्रीमंत ना. बा. बालमंदिर), प्राथमिक विभागात आरती सुधीर पाटील (माई बाल विद्यामंदिर), संजय गजानन माळी (बाबुराव आवाडे, विद्यामंदिर क्रमांक ५१), माध्यमिक विभागामध्ये सुभाष कृष्णाप्पा मगदूम (व्यंकटेश्वरा इंग्लिश स्कूल), अर्चना ज्ञानेश्वर दाभोळे (व्यंकटराव हायस्कूल), दीपक सुरेश अथने (आंतरभारती विद्यालय), पार्श्वनाथ आप्पासो पाटील (राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल), महाविद्यालय विभागात प्रा. डॉ. शहाजहान मेहबूब मणेर (प्राचार्य, दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स व कॉमर्स कॉलेज) यांची निवड केली आहे. या निवड समितीमध्ये रोटरी क्लबचे अध्यक्ष संतोष पाटील, सेक्रेटरी चंद्रकांत मगदूम, प्रोजेक्ट चेअरमन अजित कुरडे, शिवदास कित्तुरे, सुजित मगदूम यांनी सहभाग घेतला.

# आदर्श शिक्षकांची 'रोटरी'तर्फे निवड

इचलकरंजी, ता. २० : रोटरी क्लब इचलकरंजीतर्फे आदर्श शिक्षक नेशन बिल्डर ॲवॉर्ड जाहीर करण्यात आले. दरवर्षी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यात येतो. या वर्षीही पुरस्काराची परंपरा जोपासत क्लबने आदर्श शिक्षकांची निवड केली. बालवाडी विभागात निशा दंडगे (ना. बा. बाल मंदिर), प्राथमिक विभागात आरती पाटील (माई बाल विद्यामंदिर), संजय माळी (बाबूराव आवडे, विद्यामंदिर क्रमांक ५१), माध्यमिक विभागात सुभाष मगदूम (व्यंकटेश्वरा इंग्लिश स्कूल), अर्चना दाभोळे (व्यंकटराव हायस्कूल), दीपक अथने (आंतरभारती विद्यालय), पार्श्वनाथ पाटील (राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल), महाविद्यालय विभागात प्रा. डॉ. शहाजहान मनेर (प्राचार्य, डीकेएएससी कॉलेज) यांची निवड केली. वितरण बुधवारी (ता. २३) सायंकाळी सहा वाजता रोटरी सेवा केंद्र दाते मळा येथे होणार आहे.

OCTOBER - 2024 - 25



इचलकरंजी : राजमाता जिजाऊ बुद्धिबळ चषक स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

# जलद बुद्धिबळ स्पर्धेत अभय भोसले विजेता

इचलकरंजी, ता. १० : रोटरी क्लब येथे झालेल्या राजमाता जिजाऊ चषक २०२४ या १५ वर्षांखालील जलद बुद्धिबळ स्पर्धेत अभय भोसले (जांभळी) विजेता, तर स्वप्नील डाके उपविजेता ठरला. रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी, जिजाऊ महिला नागरी सहकारी पतसंस्था यांच्या वतीने चेस असोसिएशन कोल्हापूर यांच्या मान्यतेने स्पर्धेचे आयोजन करण्यात आकेले होते.

स्पर्धेत १०८ स्पर्धकांनी सहभाग घेतला. विजेत्यांना रोटरीचे अध्यक्ष संतोष पाटील, चंद्रकांत मगदूम, शिवदास कितुरे, डॉ अभिजित कलावडे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक साल्वी कितुरे, अशोक कोळी, विश्वनाथ पाटील यांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. यावेळी साल्वी कितुरे यांनी बुद्धिबळ खेळ, वैयक्तिक तयारी याबाबत पालक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धेचे नियोजन इचलकरंजी चेस ॲकॅडमीने केले. पंच म्हणून शैलेश होनकट्टी, शंकर आडम, कपिल ठोमके, अनिता भोसले यांनी काम पाहिले.

स्पर्धेचा निकाल अनुक्रमे असा : खुला गट : अभय भोसले, स्वप्नील डाके, वेदांत पुजारी,अनीश कलवडे, आदित्य कोळी. बेस्ट गर्ल : प्रियदर्शनी ठोमके, समृद्धी मांजवे, नंदिनी सारडा.

सत्कार करण्यात आला.



बुद्धिबळ स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरणप्रसंगी प्रमुख पाहुणे व मान्यवर.

# इचलकरंजीत जलद बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात संपन्न

इचलकरंजी, ता. १०-

रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी आयोजित, इचलकरंजी व जिजाऊ महिला नागरी सहकारी पतसंस्था इचलकरंजी, पुरस्कृत चेस असोसिएशन, कोल्हापूर यांच्या मान्यतेने 'राजमाता जिजाऊ चषक २०२४' या १५ वर्षाखालील जलद बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन केले होते.

स्पर्धेत १०८ स्पर्धकांनी भाग घेतला. या स्पर्धा रोटरी क्लब येथे संपन्न झाल्या. स्पर्धेचे उद्घाटन अध्यक्ष संतोष पाटील यांच्या हस्ते झाले तर बक्षीस समारंभ सेक्रेटरी चंद्रकांत मगदूम, प्रोजेक्ट चेअरमन शिवदास कितुरे, डॉ. अभिजीत कलवडे, इंटरनॅशनल चेस कोच साल्वी कितुरे तसेच अशोक कोळी, विश्वनाथ पाटील यांच्या हस्ते झाला. या स्पर्धेत खुला गट-प्रथम क्र-अभय भोसले; द्वितीय क्र.-स्वप्निल डाके, तृतीय-वेदांत पुजारी, बेस्ट गर्ल-प्रथम क्रमांक-प्रियदर्शनी ठोमके, द्वितीय - समृद्धी गांजवे, तृतीय क्रमांक-नंदिजी सारडा यांनी मिळविला. विजेत्या खेळाडूंना सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. याचबरोबर इतर उत्तेजनार्थ ७० खेळाडूंना मेडल देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे नियोजन इचलकरंजी आणि आडम चेस अकॅडमी यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पंच शैलेश होनकट्टी, शंकर आडम, कपिल ठोमके, अनिता भोसले यांचे सहकार्य लाभले.

OCTOBER-2024-25

# शिक्षकांना अंतरिक आवाज ओळखता आला पाहिजे : कुलगुरू डॉ.पाटील



इचलकरंजी : प्रतिनिधी–

शिक्षकांनी संघटीत राहुन स्वार्थी भावना बाजूला ठेवल्या पाहिजेत. कोणत्याही गोष्टीकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे. प्रगत गोष्ट कशामुळे होते त्याच्या मुळापर्यंत जाणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांना स्वतःचा आणि विद्यार्थ्यांचा अंतरिक आवाज ओळखता आला पाहिजे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ.पी.एस .पाटील यांनी केले. येथील रोटरी क्लबच्या नेशन बिल्डर पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

कुलगुरू पाटील यांनी समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन चांगला असला पाहिजे. समाजात चांगले काय, वाईट काय हे ओळखून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे असल्याचे सांगितले. डॉ. प्रशांत कांबळे यांनी पुरस्कार हा व्यक्तीला नसून तो त्यांनी केलेल्या कार्याला दिला जातो. त्यामुळे कोणतीही स्वार्थी भावना मनात न ठेवता राष्ट्र उभारणीसाठी प्रत्येकाने प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अभय यळरुटे यांनी संपादित केलेल्या ॲक्शन बुलेटिनचे प्रकाशन करण्यात आले.

तसेच निशा भारत दंडगे, आरती सुधीर पाटील, संजय गजानन माळी, सुभाष कृष्णाप्पा मगदूम, अर्चना ज्ञानेश्वर दाभोळे, दीपक सुरेश अथने, पार्श्वनाथ आप्पासो पाटील, प्रा.डॉ. शहाजहान मेहबूब मनेर यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. प्रारंभी रोटरी क्लबचे अध्यक्ष संतोष पाटील, प्रकल्प प्रमुख अजित कुरडे यांनी कार्यक्रमाचा उद्देश विषद केला.

कार्यक्रमास यतीराज भंडारी, सुजित मगदूम, नेमिनाथ कोथळे, चंद्रकांत मगदूम, मीनाक्षी तंगडी यांच्यासह रोटरीचे पदाधिकारी, शिक्षक उपस्थित होते.

OCTOBER - 2024 - 25

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा आंतरिक आवाज ओळखावा

▪ प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

शिक्षकाने ठरवले तर जगात सर्व काही शक्य आहे. त्यांनी हेवेदावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला तरच नेशन बिल्डर होऊ शकतो. एकत्र टिकून राहिले पाहिजे, स्वार्थी भावना बाजूला ठेवून काम केले पाहिजे. कोणत्याही गोष्टीकडे सकारात्मक दृष्टी असली पाहिजे. प्रगत गोष्ट कशामुळे होते. त्याच्या मुळापर्यंत जाणे गरजेचे आहे त्यासाठी त्यांनी स्वतःचा व विद्यार्थ्यांच्या अंतरिक आवाज ओळखता आला पाहिजे, असे मत प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीच्या नेशन बिल्डर अवॉर्ड २०२४ कार्यक्रमात ते बोलत होते. डिस्ट्रिक्ट लिटरसी सेक्रेटरी डॉ. प्रशांत कांबळे, उपप्रांतपाल यतीराज भंडारी, लिटरसी डायरेक्टर सुजित मगदूम यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वागत रोटरी क्लबचे अध्यक्ष संतोष पाटील यांनी केले. प्रोजेक्ट कमिटी चेअरमन अजित कुरडे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख नेमिनाथ कोथळे यांनी करून दिली.

डॉ. प्रशांत कांबळे यांनी पुरस्कार हा व्यक्तीचा नसून तो त्यांनी केलेल्या कार्याचा असतो. त्यामुळे कोणतीही स्वार्थी भावना मनात न ठेवता राष्ट्र उभारणी करता प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजे. उपप्रांतपाल यतीराज भंडारी यांनी मनोगत व्यक्त केले.

क्लबचे ॲक्शन बुलेटिन अभय यळरुटे यांनी संपादित केलेले ॲक्शन बुलेटिनचे प्रकाशन झाले. पुरस्कार प्राप्त व्यक्तीमध्ये निशा भारत दंडगे, आरती सुधीर पाटील, संजय गजानन माळी, सुभाष कृष्णाप्पा मगदूम, अर्चना ज्ञानेश्वर दाभोळे, दिपक सुरेश अथणे, पार्श्वनाथ आप्पासो पाटील, प्रा. डॉ. शहाजहान मेहबूब मणेर यांचा समावेश होता. पुरस्कार प्राप्त प्रा. डॉ. शहाजान मनेर यांनी मनोगत व्यक्त केले. आभार रोटरीचे सेक्रेटरी चंद्रकांत मगदूम यांनी मानले. सूत्रसंचालन मीनाक्षी तंगडी यांनी केले.कार्यक्रमास रोटरीचे पदाधिकारी, शिक्षक, निमंत्रित उपस्थित होते.



**इचलकरंजी : रोटरी क्लबच्या नेशन बिल्डर ॲवॉर्ड वितरणप्रसंगी पुरस्कार प्राप्त व्यक्ती समवेत प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रोटरी पदाधिकारी.**

# शिक्षकांना विद्यार्थ्यांचा आंतरिक आवाज ओळखता आला पाहिजे

## डॉ.पी.एस.पाटील; रोटरी क्लबच्या नेशन बिल्डर ॲवॉर्डचे वितरण संपन्न

इचलकरंजी,ता.२८-

**शिक्षकाने ठरवले तर जगात सर्वकाही शक्य आहे. त्यांनी हेवेदावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला तरच नेशन बिल्डर होऊ शकतो. एकत्र टिकून राहिले पाहिजे. स्वार्थी भावना बाजूला ठेवून काम केले पाहिजे. कोणत्याही गोष्टीकडे सकारात्मक दृष्टी असली पाहिजे.**

प्रगत गोष्ट कशामुळे होते त्याच्या मुळापर्यंत जाणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांना स्वतःचा व विद्यार्थ्यांचा आंतरिक आवाज ओळखता आला पाहिजे,असे उद्गार शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीच्या नेशन बिल्डर ॲवॉर्ड २०२४ कार्यक्रमात ते बोलत होते. डिस्ट्रिक्ट लिटरसी सेक्रेटरी डॉ. प्रशांत कांबळे, उपप्रांतपाल यतीराज भंडारी, लिटरसी डायरेक्टर सुजित मगदूम यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वागत पर मनोगत रोटरी क्लबचे अध्यक्ष संतोष पाटील यांनी केले तर प्रोजेक्ट कमिटी चेअरमन अजित कुरडे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख नेमिनाथ कोथळे यांनी करून दिली. डॉ. प्रशांत कांबळे यांनी पुरस्कार हा व्यक्तीचा नसून तो त्यांनी केलेल्या कार्याचा असतो त्यामुळे कोणतेही स्वार्थी भावना मनात न ठेवता राष्ट्र उभारणी करता प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजे असे सांगून त्यांनी रोटरीच्या कार्याची माहितीही दिली.

यावेळी उपप्रांतपाल यतीराज भंडारी यांचेही शुभेच्छा पर मनोगत झाले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रोटरी क्लबचे ॲक्शन बुलेटिन रो. अभय यळरुटे यांनी संपादित केलेले ॲक्शन बुलेटिनचे प्रकाशन पाहुण्यांचे हस्ते झाले. प्रमुख पाहुण्यांचे हस्ते पुरस्काराचे वितरण झाले. पुरस्कार प्राप्त व्यक्तींमध्ये सौ. निशा दंडगे, सौ. आरती सुधीर पाटील, श्री. संजय गजानन माळी, सुभाष कृष्णाप्पा मगदूम, सौ. अर्चना ज्ञानेश्वर दाभोळे, दीपक सुरेश अथने, पार्श्वनाथ आप्पासो पाटील, प्रा. डॉ. शहाजहान मेहबूब मनेर यांचा समावेश होता. आभार चंद्रकांत मगदूम यांनी मानले. सूत्रसंचालन सौ. मीनाक्षी तंगडी यांनी केले.



**नेशन बिल्डर ॲवॉर्ड पुरस्कार प्राप्त शिक्षक व प्रमुख मान्यवर.**

NOVEMBER-2024-25

Rotary **सस्नेह निमंत्रण**

**रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी** आयोजित

# रोटरी व्याख्यानमाला
## २०२४

(पुष्प-पहिले)

**वक्ते - डॉ. उदय निरगुडकर**
(ज्येष्ठ पत्रकार)



**विषय - विकसित महाराष्ट्र**

तरी सदर कार्यक्रमास सर्व सजग नागरीक, बंधू-भगिनींनी अवश्य उपस्थित रहावे.

**रो. चंद्रकांत मगदुम** — क्लब सेक्रेटरी
**रो. संतोष जे. पाटील** — क्लब अध्यक्ष

* सर्व सदस्य, रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी *

वेळ- रविवार, दि. १० नोव्हेंबर २०२४ रोजी सायं. ६.०० वा.

स्थळ- रोटरी श्रीमती सोनीदेवी रा. बाहेती सेवा केंद्र, दाते मळा, इचलकरंजी

# इचलकरंजीत आज ज्येष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांचे व्याख्यान

**इचलकरंजी : प्रतिनिधी–**

येथील रोटरी क्लबने जेष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांचे विकसित महाराष्ट्र या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. १० नोव्हेंबरला सायं. ६ वाजता येथील रोटरी बाहेती सेवा केंद्र, महेश सेवा समिती जवळ येथे हे व्याख्यान होणार आहे. या व्याख्यानाचा नागरीकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रोटरी क्लबने केले आहे.

OCTOBER - 2024 - 25




इचलकरंजी : रोटरीतर्फे आयजीएमला आयईसी मटेरियलची देणगी देतेवेळी पदाधिकारी, मान्यवर.

# रोटरीतर्फे आयजीएमला आयईसी मटेरियलची देणगी

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयाकडून सुरु असलेल्या सेवेची दखल रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी या संस्थेने घेत रुग्णालयातील कार्यरत कर्मचाऱ्यांकडून तसेच त्या विभागाकडून देण्यात येणाऱ्या आरोग्य शिक्षणाची रुग्णांना माहिती होण्यासाठी १.१० लाखाचे आयईसी मटेरियल देणगी स्वरूपात दिले आहे.

अध्यक्षस्थानी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ नंदकुमार बनगे होते. त्यांनी रोटरी कल्ब ऑफ इचलकरंजी या संस्थेने या रुग्णालयास केलेल्या मदतीसाठी आभार मानत पुढील काळात असेच सहकार्य या रुग्णालयास राहो, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीचे पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर नासीर बोरसदावाला, रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीचे प्रोजेक्ट मॅनेजर ऋषी महोंका, माजी अध्यक्ष सुनील सातपुते, विद्यमान अध्यक्ष संतोष पाटील, सेक्रेटरी पंकज कोठारी, चंद्रकांत मगदूम, रोटरी ॲनस क्लब इचलकरंजीच्या अध्यक्षा शर्मिला पाटील, सेक्रेटरी वैशाली कोठारी, रुग्णालयीन कर्मचारी, अधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन बाह्यरुग्ण विभागाचे अधिपरीचारक अक्षय मोरे यांनी केले. बालरुग्ण तज्ज्ञ परिचारिका रुपाली बळीवंत यांनी आभार मानले.

~~SEPTEMBER~~ - 2024 - 25

NOVEMBER - 2024 - 25

# उस्फुर्तपणे मतदान करणे आवश्यक : डॉ. निरगुडकर

इचलकरंजी : प्रतिनिधी–

समाजात खोटे नेरेटिव्ह पसरवून समाजाची दिशाभूल केली जात आहे. समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे समाजाने जागृत झाले पाहिजे. विकसित महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी उस्फुर्तपणे मतदान करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांनी केले. येथील रोटरी क्लबच्यावतीने आयोजित विकसीत महाराष्ट्र या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.




डॉ. निरगुडकर यांनी गेल्या दहा वर्षात भारत जागतिक पातळीवर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून महासत्ता म्हणून उदयास येत आहे. त्यामुळे विकसित महाराष्ट्राच्या जडणघडणीत उस्फुर्तपणाने मतदान झाले पाहिजे, असे सांगितले. यावेळी त्यांनी विविध सामाजिक, राजकीय घडामोडी तसेच प्रवाह यांवर आपल्या खास शैलीत विचार व्यक्त केले. व्याख्यानास रोटरी क्लबचे अध्यक्ष संतोष पाटील, रविंद्र नाकील, चंद्रकांत मगदूम यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

दैनिक महासत्ता इच



रोटरीच्या व्याख्यानमालेत बोलताना डॉ.उदय निरगुडकर, शेजारी संतोष पाटील,चंद्रकांत मगदूम,रविंद्र नाकील.

# महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी मतदान करणे आवश्यक-डॉ. निरगुडकर

इचलकरंजी,ता.११–

गेल्या दहा वर्षात भारत जागतिक पातळीवर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून महासत्ता म्हणून उदयास येत आहे. विकसित महाराष्ट्राच्या जडणघडणीत उत्स्फूर्तपणाने मतदान झाले पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व संपादक डॉ.उदय निरगुडकर यांनी केले.

येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी यांच्या विद्यमाने आयोजित 'रोटरी व्याख्यानमाला २०२४' निमित्त डॉ.उदय निरगुडकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन रोटरी श्रीमती सोनीदेवी बाहेती सेवा केंद्र येथे करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ.निरगुडकर यांनी विविध सामाजिक व राजकीय घडामोडी तसेच प्रवाह यांवर आपल्या खास शैलीत विचार व्यक्त करत समाजात खोटे नेरेटिव्ह पसरवून समाजाची दिशाभूल केली जात आहे. समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला जात आहे तेव्हा समाजाने जागृत झाले पाहिजे, असेही ते म्हणाले. स्वागत आणि प्रास्ताविक रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीचे अध्यक्ष संतोष पाटील यांनी केले. वक्त्यांचा परिचय रविंद्र नाकील यांनी करून दिला.यावेळी सेक्रेटरी चंद्रकांत मगदूम व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

NOVEMBER- 2024-25

दैनिक महासत्ता इच

## रोटरीतर्फे डॉ.उदय निरगुडकर यांचे आज व्याख्यान

इचलकरंजी,ता. ९-

येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीच्या वतीने रोटरी व्याख्यानमाला २०२४ आयोजित केली आहे.या व्याख्यानमालेत पहिले पुष्प ज्येष्ठ पत्रकार डॉ.उदय निरगुडकर यांचे व्याख्यान आयोजित केले आहे.

व्याख्यानाचा विषय विकसित महाराष्ट्र हा आहे. सदरचे व्याख्यान रविवार दिनांक १० नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ठीक सहा वाजता रोटरी श्रीमती सोनेदेवी रामबिलास बाहेती सेवा केंद्र, दाते मळा, महेश सेवा समिती जवळ, इचलकरंजी येथे आयोजित केले आहे.तरी सदर व्याख्यानाचा सर्व नागरिक बंधू-भगिनींनी अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी तर्फे करण्यात आले आहे.

कोल्हापूर पान ११

## रोटरीतर्फे ज्येष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांचे आज व्याख्यान

**इचलकरंजी** : येथील रोटरी क्लबच्यावतीने रोटरी व्याख्यानमाला २०२४ आयोजित केली आहे. या व्याख्यानमालेत पहिले पुष्प जेष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांचे विकसित महाराष्ट्र' यावर व्याख्यान होणार आहे.

व्याख्यान रविवार १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता रोटरी श्रीमती सोनीदेवी रामबिलास बाहेती सेवा केंद्र, दाते मळा, महेश सेवा समिती जवळ, इचलकरंजी येथे आहे.

तरी याचा सजग नागरिक, बंधू - भगिनींनी मोठ्या संख्येने येवून अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी यांनी केले आहे.

JULY · 2024-25



संतोष पाटील



चंद्रकांत मगदूम



शरद देसाई

# रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी संतोष पाटील

इचलकरंजी,ता.६ -

..............................

**येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीच्या सन २०२४–२५ वर्षाकरिता अध्यक्षपदी संतोष पाटील, सचिवपदी चंद्रकांत मगदूम, खजिनदारपदी शरद देसाई यांची एकमताने निवड झाली.**

प्रेसिडेंट इलेक्ट संजय धायतिडक, व्हा. प्रेसिडेंट पंकज कोठारी, जॉईंट सेक्रेटरी पिरगोंडा पाटील, डायरेक्टर क्लब सर्व्हिस सुशिल माहेश्वरी, व्होकेशनल सर्व्हिस सुनिल यळरूटे, रोटरॅक्ट व इंटरॅक्ट डॉ.अभिजीत कलवडे, कम्युनिटी सर्व्हिस सागर पाटील,न्यू जनरेशन राजाराम जाधव, पोलिओ प्लस संजय खोत,इंटरनॅशनल सर्व्हिस किरण पाटील,सार्जंट अ‍ॅट आर्मस् मुकुंद माळी, लिट्रसी कमिटी सुजित मगदूम, युथ सर्व्हिसअनिल भुतडा, इमे.पास्ट प्रेसिडेंट सुनिल सातपुते,रोटरी वेल्फेअर ट्रस्ट चेअरमन प्रकाश गौड यांची नुतन ...रिणीमध्ये निवड झाली आहे.

## अवतीभवती



संतोष पाटील



चंद्रकांत मगदूम

### रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी संतोष पाटील

**इचलकरंजी :** येथील रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी संतोष पाटील, सचिवपदी चंद्रकांत मगदूम, खजिनदारपदी शरद देसाई यांची निवड झाली. अन्य कार्यकारिणी अशी, प्रेसिडेंट इलेक्ट - संजय धायतिडक, व्हाईस प्रेसिडेंट - पंकज कोठारी, जॉईंट सेक्रेटरी - पिरगोंडा पाटील, डायरेक्टर क्लब सर्व्हिस सुशील माहेश्वरी, व्होकेशनल सर्व्हिस सुनील यळरुटे, रोटरॅक्ट व इंटरॅक्ट - डॉ. अभिजित कलवडे, कम्युनिटी सर्व्हिस - सागर पाटील, न्यू जनरेशन - राजाराम जाधव, पोलिओ प्लस - संजय खोत, इंटरनॅशनल सर्व्हिस किरण पाटील, सार्जंट अ‍ॅट आर्मस् - मुकुंद माळी, लिट्रसी समिती - सुजित मगदूम, यूथ सर्व्हिस - अनिल भुतडा, वेल्फेअर ट्रस्ट - प्रकाश गौड.

JULY · 2024 · 25

मंगळवार २ जुलै २०२४

# इचलकरंजीत आजपासून आत्मदर्शन शिबिर

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी व आत्मदर्शन परिवार, इचलकरंजी यांच्या विद्यमाने २ ते १४ जुलै या दरम्यान आत्मदर्शन शिबीराचे आयोजन केले आहे. हे शिबीर रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी, दाते मळा, इचलकरंजी येथे होणार आहे.

मंगळवार २ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता प्रवेश, मार्गदर्शन व उद्घाटन होणार आहे. आत्मदर्शन या विषयातील प्राणायाम व योग तज्ज्ञ आत्मदर्शनचे प्रणेते परम पूज्य योगगुरु संजीव कुलकर्णी (गुरुजी) हे या शिबिरात मार्गदर्शन करणार आहेत. आपल्याला सदैव आनंदी असावे असे वाटते ना? आत्मदर्शन शिबीराचे आयोजन यासाठीच केले आहे.

व्यसनमुक्ती, वजन कमी होणे, चंचलता कमी होणे, वित्त एकाग्र होणे, उत्साह, स्मरणशक्ती व बुध्दीमत्तेत वाढ या शिबीरामुळे घडून येते. मानसिक शांती आणि



समाधानाची स्थिती आपणांस प्राणायाम, आहार, ध्यान, योगासने याद्वारे मिळून चांगले आयुष्य जगण्याची इच्छा निर्माण होते. हे ज्ञान हसत खेळत अनुभवातून मिळणार आहे. तरी या शिबीराचा लाभ शहर व परिसरातील लोकांनी घ्यावा, असे आवाहन रोटरी क्लब व आत्मदर्शन परिवार इचलकरंजीच्यावतीने साधक आण्णासाहेब शहापुरे व प्रकाश रावळ यांनी केले आहे.

# ध्यानातून एकाग्रता व शांतता मिळते

## -संजीव कुलकर्णी

इचलकरंजी,ता.२२-

सर्व विद्यामध्ये आध्यात्मिक विद्या श्रेष्ट आहे.तुर्या अवस्थेत दिवसातून तीनवेळा ध्यान करावे.त्यातूनच एकाग्रता व शांतता मिळून बौध्दिक,शारिरीक व मानसिक स्थिती चांगली राहते, असे विचार आत्मदर्शनचे प्रणेते योगगुरू संजीव कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी व आत्मदर्शन परिवार इचलकरंजी यांच्या विद्यमाने सुरू असलेल्या आत्मदर्शन शिबिरात स्वरूपानुसंधान दिवशी ते बोलत होते. यावेळी गुरूपाद पुजा, गणेश पुजन, भजन सत्संग होवून रोटरी गार्डनमध्ये विविध खेळ घेण्यात आले. यावेळी आनंद प्रस्थान,निसर्ग भ्रमणासाठी आत्मदर्शन शिबीर क्रमांक २६६ ची बॅच आनंदकुंज गगनबावडा येथे साधक व स्वयंसेवकांसह रवाना झाली.



स्वरूपानुसंधान दिवशी गुरूपाद्य पुजा करताना संजीव कुलकर्णी, प्रकाश रावळ, आण्णासाहेब शहापुरे व इतर मान्यवर.

या शिबिरासाठी प्रकाश रावळ, आण्णासाहेब शहापुरे, राजकुमार थोरवत, इराण्णा सिंहासने, धोंडीराम पुजारी, शिवनारायण उंटवाल, संभाजी गोरे, सुरेश पाडळे, आबा बडवे, अशोक महाजन, संजय पाटील, परशराम वर्मा, प्रतिभा संत, शितल खटावकर हे परिश्रम घेत आहेत.